प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे
दिनांक - ०४/०७/२०१९

**वानवडी पोलीसांकडुन सराईत गुन्हेगारांना पकडुन त्यांचेकडुन पुणे शहर, पुणे ग्रामीण तसेच जामखेड परिसरातुन वाहन चोरी, इतर चोरी, जबरी चोरी, घरफोडी चोरीच्या एकुण १० गुन्ह्यांची उकल**

वानवडी पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी हे पोलीस ठाणेस हजर असताना पो.शि. नासीर देशमुख व पो.शि.सुधीर सोनवणे यांना त्यांचे बातमीदाराने व त्यांनी तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांना कळविले की, तीन इसम हे जे.एस.पी.एम. कॉलेज गेट नंबर ३ चे बाजुला लेडीज होस्टेलच्या शेजारील कंपाऊंडचे भिंतीलगत रोडवर उभे असुन त्यांचेकडे एक काळ्या रंगाची यामाहा फेजर गाडी क्रमांक एम.एच. MH-12/GH/7106 ही असुन ती चोरीची असल्याचा संशय आहे. अशी खबर मिळताच मा.वरिष्ठांचे आदेशान्वये तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे सदर ठिकाणी जावुन त्यांनी बातमीप्रमाणे खात्री करुन पाहणी केली असता बातमीप्रमाणे तीन संशयीत इसम आढळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी आपली नावे (१) ओंकार विनोद मासाळ उर्फ हर्षद सलीम शेख वय २० वर्षे रा.साईविहार कॉलनी सर्वे नंबर ३०२ रेल्वे लाईनच्या जवळ काळेपडळ हडपसर पुणे सध्या रा.शेवाळवाडी पुणे सोलापुर हायवे रोड हडपसर पुणे (२) किरण उर्फ जॉय मॅनवल रुपटक्के वय २१ वर्षे रा.काळेपडळ फिरस्ता हडपसर पुणे मुळ गाव मु.पो.ठोसर ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर, (३) स्वप्निल नागनाथ बोधले वय १९ वर्षे रा.शिवनगर ढेरे कंपनीजवळ गल्ली नंबर २ गणपती मंदीरामागे काळेपडळ हडपसर पुणे अशी असल्याचे सांगुन त्यांना ताब्यात घेवुन, वानवडी पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचे ताब्यात मिळुन आलेल्या मोटार सायकलबाबत अधिक तपास केला असता त्यांनी वाहन चोरीचा गुन्हा केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन तसे त्यांनी कबुल केले आहे. सदरबाबत वानवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ३७९/२०१९ भा.दं.वि.कलम ३७९,३४ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

नमुद आरोपीतांना दाखल गुन्ह्यात अटक करुन त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी वानवडी, कोंढवा, हडपसर, मार्केटयार्ड, खडक, शिक्रापुर, जामखेड परिसरात वाहन चोरी, इतर चोरी, जबरी चोरी, घरफोडी चोरी, केल्याचे तपास निष्पन्न झाले असुन त्यांचकडुन एकुण १० गुन्ह्यांची उकल करुन एकुण ५,८७,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

तसेच आरोपी नामे ओंकार विनोद मासाळ उर्फ हर्षद सलीम शेख वय २० वर्षे रा.साईविहार कॉलनी सर्वे नंबर ३०२ रेल्वे लाईनच्या जवळ काळेपडळ हडपसर पुणे सध्या रा.शेवाळवाडी पुणे सोलापुर हायवे रोड हडपसर पुणे हा वानवडी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर १२४/२०१९ भा.दं.वि. कलम ३२४, आर्म अॅक्ट कलम ४(२५), महा.पो.का.कलम ३७(१) (३) १३५ मधील फरारी आरोपी आहे.

सदरची कारवाई ही श्री सुनिल फुलारी सो, मा.अपर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशीक विभाग पुणे शहर, श्री सुहास बावचे, मा.पोलीस उप-आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर, श्री सुनिल देशमुख, सहा.पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे शहर (अतिरिक्त कार्यभार वानवडी विभाग पुणे शहर), श्री क्रांतीकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, श्री सलीम चाऊस, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सो, वानवडी पोलीस ठाणे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक,राजेंद्र गायकवाड, सहा.पोलीस फौज.रमेश भोसले, पो.हवा.राजु रासगे, पो.ना.योगेश गायकवाड, पो.ना.ज्ञानदेव गिरमकर, पो.ना.सुदर्शन बोरावके, पो.ना.संभाजी देवीकर, पो.शि.नवनाथ खताळ, पो.शि.शिरीष गोसावी, पो.शि.प्रतिक लाहीगुडे, महेश कांबळे यांचे पथकाने केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वानवडी पोलीस ठाणे पुणे (stamp)

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर

